मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील गरजू रुग्ण महापौर निधीपासून वंचित

## महापालिका अधिकाऱ्यांकडून तोडगा काढला जात नसल्याने रुग्ण मदतीपासून वंचित

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेतील प्रशासकीय राजवटीमुळे शहरातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना त्याचा आर्थिक फटका बसला आहे. महापौरपद रिक्त असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टकडून त्या रुग्णांना मिळणारी 5 हजार रुपयांची वैद्यकीय मदत गेल्या तीन वर्षांपासून बंद आहे. महापालिका अधिकाऱ्यांकडून तोडगा काढला जात नसल्याने रुग्ण मदतीपासून वंचित आहेत.



महापालिकेने 4 सप्टेंबर 1991 ला या ट्रस्टची स्थापना केली. औषधोपचारासाठी अर्थसाह्य करणे, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्तीसमयी पीडितांना अर्थसहाय करणे हा मुख्य उद्देश आहे. ट्रस्टच्या माध्यमातून शहरातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी 5 हजार रुपये मदत केली जाते. धनादेशावर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून महापौरांची सही असते. ही रक्कम कमी असली, तरी त्यामुळे गरीब रुग्णांना थोडासा आर्थिक दिलासा मिळतो. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या या ट्रस्टचे अध्यक्षपद महापौरांकडे आहे. या ट्रस्टमध्ये उपमहापौर (उपाध्यक्ष), सहआयुक्त (सचिव), मुख्य लेखापाल (खजिनदार), स्थायी समिती सभापती, विधी समिती सभापती, सभागृह नेता, मुख्य लेखा परीक्षक व क्रीडा विभागाचे उपायुक्त (सदस्य) यांचा समावेश आहे. मात्र, प्रशासकीय राजवटीत महापौर नसल्याने ती मदत रुग्णांना मिळू शकत नाही आहे. दरम्यान, महापौरांच्या अध्यक्षतेखाली ट्रस्टचे कामकाज चालते. तत्कालीन महापौर उषा ढोरे यांची मुदत संपल्यापासून शहराचे प्रथम नागरिक असलेल्या महापौरांचे पद रिक्त आहे. गरजू रुग्णांना मदत करणाऱ्या ट्रस्टचे कामकाज पूर्णपणे बंद आहे.

### महिन्याला 20 रुग्णांना आर्थिक मदत

» राज्याच्या नगरविकास विभागाच्या 18 डिसेंबर 2007 च्या निर्णयानुसार पालिकेच्या वतीने ट्रस्टला दरवर्षी 25 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. पालिका अर्थसंकल्पात त्या रकमेची तरतूद केली जाते. या निधीतून हृदयरोग, कर्करोग, किडनी, मेंदूचे आजार असे विविध दुर्धर आजाराने ग्रासलेले, अपघातात गंभीर जखमी, नैसर्गिक आपत्तीने पीडित असलेल्या रुग्णांना मदत म्हणून ट्रस्टतर्फे प्रतिरुग्ण 5 हजार रुपये सहाय्य केले जाते. दरमहा किमान 20 रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक मदतीसाठी अर्ज करतात.

### मानवतेच्या दृष्टिकोनातून महापौर निधी दिला जावा

» महापालिकेचा महापौर निधी देणे बंद आहे. अनेक रुग्ण आर्थिक मदतीअभावी वेगवेगळ्या सामाजिक संस्थेकडे निधीसाठी धाव घेत आहेत. योग्य वेळी उपचार न मिळाल्यामुळे अडचणीत येत आहेत. पैश्याअभावी रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून व सामाजिक बांधिलकीतून या निधीचे लेखापरीक्षण पूर्ण करून गरजू रुग्णांसाठी महापौर निधी पुन्हा सुरुवात करावे, अशी मागणी शरद पवार संजीवनी आरोग्य मित्रचे राज्यप्रमुख डॉ. सतीश कांबळे यांनी केली आहे.

# पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा कुस्ती आखाडा "भैरवनाथ केसरी"

## भोसरीच्या उत्सवामध्ये 5 महाराष्ट्र केसरी, 15 राष्ट्रीय पैलवानांची उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची कुस्ती पंढरी असणाऱ्या भोसरीमध्ये यंदा श्री. भैरवनाथ महाराजांचा उत्सव भारत केसरी आणि महाराष्ट्र केसरी यांच्या लक्षवेधी कुस्तीने गाजणार आहे. यंदा कुस्ती मैदानात "भैरवनाथ केसरी" किताबासाठी भारत केसरी वीरेंद्र दहिया आणि महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ यांच्यात लढत होणार असून, या लढतीकडे कुस्ती शौकिनांचे लक्ष लागले आहे. पुणे जिल्ह्यातील हा सर्वात मोठा कुस्ती आखाडा होणार आहे.

भोसरीचे ग्रामदैवत श्री. भैरवनाथ महाराजांचा उत्सव दि. १५ व १६ एप्रिल रोजी साजरा करण्यात येत असून, बुधवारी (१६ एप्रिल) दुपारी ४ वाजता आखाडा पूजन करुन लढतींची सुरूवात होईल. कै. सदाशिवराव रामभाऊ फुगे कुस्ती आखाड्यात कै. ह.भ.प. रामचंद्र बाबुराव लांडगे (वस्ताद), कै. पै. सुदाम रामचंद्र लांडगे यांच्या स्मरणार्थ भैरवनाथ केसरी मानाची गदा आणि ३ लाख रुपये रोख बक्षीस घोषीत केले आहे. "भैरवनाथ केसरी' किताबासाठी पुणे जिल्ह्याचा महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ विरुद्ध भारत केसरी वीरेंद्र दहिया यांच्यात सामना होईल. पैलवान मोहोळ यांच्यासोबत महाराष्ट्रात कोणताही मल्ल खेळण्यास तयार नाही. त्यामुळे पंजाबचा भारतकेसरी दहिया याने आव्हान स्विकारले असून,



ही लढत लक्षवेधी होणार आहे.

भैरवनाथ महाराजांच्या उत्सवानिमित्त दरवर्षी कुस्तीचा आखाडा लक्षवेधी ठरतो. यंदा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मल्ल यंदा आखाड्यात भिडणार आहेत. हिंद केसरी, भारत केसरी, ऑल इंडिया चॅम्पियन, एशियन चॅम्पियनसह महाराष्ट्र केसरी मल्लांच्या कुस्त्या पाहण्याचा आनंद कुस्ती शौकिनांना घेता येणार आहे. 5 महाराष्ट्र केसरी, भारत केसरी आणि 15 हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील नामांकीत कुस्तीपटू या आखाड्याला उपस्थित राहणार आहेत. विजेत्याला चांदीची गदा आणि 12 लाखापेक्षा अधिक रकमेच्या बक्षिसाने सन्मानित करण्यात येणार आहे.

आमदार महेश लांडगे, युवा नेते नितीन बाळासाहेब लांडगे यांच्या वतीने चांदीची गाथा आणि तीन लाखाचे विशेष इनाम देऊन गौरव करण्यात येणार आहे. महाराष्ट्र केसरी पै. पृथ्वीराज पाटील आणि उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायवाड यांचीही कुस्ती महाराष्ट्रात पाहिल्यांदा बघायला मिळणार आहे. सामाजिक कार्यकर्ते दत्ता गव्हाणे, पै. योगेश लांडगे, पै. धनाजी लांडगे आणि सामाजिक कार्यकर्ते अशोक पठारे यांच्या पुढाकाराने ही कुस्ती होणार आहे. यासोबतच मानाच्या सात गदांसाठी निश्चित केलेल्या २० प्रमुख लढती होणार आहेत. विशेष म्हणजे, ग्रामस्थांच्याही काही कुस्ती होणार आहेत.

भोसरीतील सर्व ग्रामस्थ आणि वडिलधारी मंडळी परंपरेप्रमाणे एकोप्याने उत्सव साजरा करीत आहेत. कुस्ती आखाडा आणि बैलगाडा शर्यती उत्सवामध्ये लक्षवेधी होणार आहेत.

# बारामतीसाठी 100 दिवसांत 1100 कोटी!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंजूर केलेल्या कामांबाबत माहिती दिली

**पुणे | प्रतिनिधी**

'बारामती शहर आणि तालुक्यात पिण्याच्या पाण्याच्या योजना केल्या आहेत. त्या सर्व मिळून दीड हजार कोटींच्या असतील. एका आमदाराला वर्षाला पाच कोटी याप्रमाणे पाच वर्षांत २५ कोटी रुपये मिळतात. बारामतीसाठी दीड हजार कोटी रुपये आणले आहेत. जानाई शिरसाई योजनेसाठी ४६० कोटी, पशुसंवर्धन विद्यालयासाठी ५६० कोटी रुपये, अशी जवळपास अकराशे कोटी रुपयांची कामे शंभर दिवसांच्या आत मंजूर केली आहेत,' अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी बारामतीमध्ये दिली.



बारामती तालुक्यातील बोरकरवाडी येथे टीसीएस फाउंडेशनच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून जानाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचा उजवा कालवा रायझिंग ते बोरकरवाडी तलावापर्यंत करण्यात आलेल्या जलवाहिनीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यांच्या हस्ते जलपूजनही करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

पवार म्हणाले, 'सरकारने लाडक्या बहिणीकडे जास्त लक्ष दिले आहे. यासंदर्भात आमच्यावर टीका झाली. निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजना बंद केली जाईल, असे विरोधकांकडून सांगण्यात आले. आम्ही ही योजना बंद करणार नाही. शेतकऱ्यांसाठी वीज सुरू ठेवलेली आहे. त्याचाही लाभ सर्वांनी घ्यावा.'

'गरीब वर्गाचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता लवकरच पुणे विभागात ३० हजार घरांचा कार्यक्रम घेतला आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन ते तीन कोटी घरांचा कार्यक्रम घेतला आहे. महाराष्ट्रासाठी २० लाख घरे मंजूर झाली आहेत. त्यापैकी पाच हजार घरे बारामतीसाठी मंजूर झाली आहेत,' असेही पवार यांनी सांगितले.

### सूरज चव्हाणच्या घराच्या बांधकामाची पाहणी

» बिग बॉस मराठीचा विजेता सूरज चव्हाण याच्या मूटी येथे नव्याने बांधकाम सुरू असलेल्या घराला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी भेट दिली. 'बिग बॉस'चा विजेता ठरल्यानंतर सूरज महाराष्ट्रभर चर्चेत आला. त्याला घर बांधण्याची इच्छा होती. त्या वेळी त्याला घर बांधून देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले होते. अजित पवारांनी दिलेले आश्वासन आता पूर्णत्वास येत असून, याबाबतचा आढावा घेण्यासाठी रविवारी पवार यांनी बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणाला भेट दिली.

### 'काकांना विश्वासात घेतल्याशिवाय चालत नाही'

'काकांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढे काही चालत नाही,' असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. बोरकरवाडीतील कार्यक्रमात अनेक कार्यकर्त्यांनी निवेदने दिली. त्याचा उल्लेख करतानाच समोर बसलेले काका कुतवळ त्यांच्याकडे पाहत म्हणाले, 'एका रस्त्याच्या कामकाजाबद्दल तुमच्याशी बोललो आहे, अधिकाऱ्यांशी बोललो आहे. त्यांना मी सांगितले आहे, की काकांना विश्वासात घ्या.' एवढे बोलून अजित पवार काही क्षण थांबले आणि पुढे म्हणाले, 'अहो, काकांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढे काही चालत नाही बाबा!' त्यांच्या या विधानावर उपस्थितांनी हसून दाद दिली. त्यावर, लगेचच, 'मी काका कुतवळांबद्दल बोलतो आहे, नाही तर लगेचच तुम्ही दादा घसरले, असे म्हणाल. पण, दादा घसरलेले नाहीत,' अशी मिश्कील टिप्पणीही त्यांनी केली.

---

# स्वारगेट-कात्रज मेट्रोचे काम तीन महिन्यांत सुरू

## दोन स्थानकांमुळे वाढलेला 683 कोटी रुपयांचा खर्च राज्य सरकार देणार

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट-कात्रज या नियोजित भूमिगत मेट्रो मार्गिका प्रकल्पातील बालाजीनगर आणि बिबवेवाडी या स्थानकांसाठी लागणारा ६८३ कोटी रुपयांचा वाढीव खर्च राज्य सरकार देणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कार्पोरेशनने (महामेट्रो) स्थानकांसाठी नव्याने निविदा काढली असून, स्वारगेट-कात्रज प्रकल्पाला येत्या तीन महिन्यांत सुरुवात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने महामेट्रोकडून स्वारगेट ते कात्रज हा ५.४६ किलोमीटर अंतरावरील भुयारी मार्गिका प्रकल्प हाती घेतला आहे. मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज अशी तीन मेट्रो स्थानके प्रस्तावित करण्यात आले असताना नागरिक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव बालाजीनगर (भारती विद्यापीठ) आणि सहकारनगर या दोन स्थानकांसाठी मागणी करण्यात आली. महामेट्रोकडून तपासणी केल्यानंतर दोन स्थानके वाढविण्यास हरकत नसल्याचे स्पष्ट करून संबंधित अहवाल राज्य सरकारकडे पाठविला होता.

दरम्यान, महानगरपालिकेने अहवालाला मंजुरी दिली. मात्र, दोन स्थानकांमुळे वाढणारा ६८३ कोटी रुपयांचा खर्च उचलणार नसल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे हा प्रश्न प्रलंबित असताना राज्य सरकारकडून संबंधित दोन्ही स्थानकांना मंजुरी देऊन वाढीव खर्चासाठी निधी देण्याबाबत हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे.

> स्वारगेट-कात्रज भुयारी मार्गिका प्रकल्पातील वाढीव दोन स्थानकांमुळे वाढीव खर्च राज्य सरकार करणार आहे. त्यामुळे आता पाच स्थानके होणार असल्याने नव्याने निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. पुढील दोन – तीन महिन्यांत या मार्गाचे काम सुरू होईल.
>
> **- हेमंत सोनवणे, कार्यकारी संचालक, महामेट्रो.**

### महामेट्रोकडून निविदा

» महामेट्रोकडून नियोजित स्वारगेट – कात्रज या भूमिगत मेट्रो मार्गासाठी चार महिन्यांपूर्वी निविदा काढण्यात आल्या होत्या. परंतु यामध्ये बालाजीनगर आणि बिबवेवाडी या दोन स्थानकांचा समावेश नव्हता. यामुळे या परिसरातील नागरिकांनी विरोध केल्यावर पालकमंत्री अजित पवार यांनी पुन्हा दोन स्थानके वाढविण्याची सूचना केली. त्यामुळे महामेट्रोकडून पुन्हा नव्याने निविदा काढण्यात आल्या आहेत. निविदेला ४० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या काळात आलेल्या निविदांची छाननी केल्यानंतर काम सुरू होणार असून, याला तीन-चार महिने लागणार आहेत.

# ठरलेल्या जागेवर वेगळाच प्रकल्प; महापालिका अधिकाऱ्यांनी झटकले हात

## वेळीच जागा ताब्यात घेऊन विकास न केल्याने त्या जागा तशाच पडून आहेत तर, काही ठिकाणी अतिक्रमणे झाली आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वीस वर्षांपूर्वीच्या विकास आराखड्यानुसार पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांतील जागांवर वेगवेगळ्या प्रकल्पांचे आरक्षणे आहेत. वेळीच जागा ताब्यात घेऊन विकास न केल्याने त्या जागा तशाच पडून आहेत. तर, काही ठिकाणी अतिक्रमणे झाली आहेत. तसेच, आरक्षित केलेल्या प्रकल्पाऐवजी वेगळाच प्रकल्प त्या ठिकाणी उभारला जात आहे. त्यामुळे नागरिक सेवा-सुविधांपासून वंचित राहत असल्याचे चित्र आहे. त्याबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगत महापालिका अधिकारी हात झटकत आहेत



### आरक्षणात बदल केला नसल्याचा दावा

» शहरातील कोणत्याही आरक्षणात नगर रचना विभागाने बदल केलेले नाहीत. तसा बदल करता येत नाही. राज्य शासनाची मान्यता घेऊन आरक्षणाच्या प्रयोजनात बदल करण्यात येतो. रावेत येथील जागेच्या आरक्षणात बदल केलेला नाही, असे नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद जगताप यांनी सांगितले.

### शहरातील अनेक भागांतील कामात बदल

» शहरातील अनेक भागांत महापालिकेने डीपीनुसार आरक्षण टाकले आहे. मात्र, जागा ताब्यात आल्यानंतर त्यात बदल करण्यात आले आहेत. त्या जागांवर अतिक्रमण झाले आहेत. जागामालकांनी परस्पर जागा विकल्याने त्या ठिकाणी खासगी बांधकामे झाली आहेत. महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ व वेळकाढू धोरणामुळे अनेक आरक्षणे विकसित झालेली नाहीत. त्यामुळे शहरातील करदाते नागरिक महापालिकेच्या सेवा व सुविधांपासून वंचित असून, प्रशासनाच्या धोरणावर टीका केली जात आहे.

### उद्यानाचे काम सुरु नाही

» रावेत येथील पवना नदीजवळील पुलाजवळील जागेत उद्यानाचे काम सुरू नाही. तो फलक आम्ही लावलेले नाही, असे महापालिकेच्या उद्यान व क्रीडा स्थापत्य विभागाचे सहशहर अभियंता मनोज सेठिया यांनी सांगितले.

#### नाल्याची दिशा बदलल्याची तक्रार

महापालिकेने रावेत येथील पवना नदी पुलाजवळील सर्व्हे क्रमांक 17/3/1 येथील खासगी जागा ताब्यात घेऊन तेथे स्मशानमूभीसाठी आरक्षण टाकले आहे. अनेक वर्षे उलटूनही त्या ठिकाणी स्मशानमूभी विकसित करण्यात आली नाही. त्या जागेचा वापर वेगळ्याच कारण्यासाठी करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. त्या आरक्षित जागेत स्मशानभूमी तयार करण्यात यावी, अशी तक्रार आहे. तसेच, तेथील जागेतून नैसर्गिक ओढा वाहतो. मात्र, बनावट कागदपत्रे व मोजणी नकाशे सादर करून एका व्यावसायिकाने तो ओढा बंदिस्त करून दुसऱ्या बाजूला वळविला आहे. बांधकाम परवानगी विभागाची दिशाभूल करून त्या ठिकाणी बांधकाम करण्यात येत आहे. त्यामुळे पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याचा वाट न मिळाल्याने ते पाणी आजूबाजूच्या भागात तसेच, हाऊसिंग सोसायटीत शिरून नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तो नाला पूर्वीप्रमाणे तयार करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

#### उद्यानाचे काम सुरू

महापालिकेच्या डीपी आराखड्यानुसार रावेत पुलाजवळील पवना नदीकाठी स्मशानभूमीचे आरक्षण आहे. त्यासाठी त्या जागेचा वापर करावा. ती जागा जमीनमालकांकडून ताब्यात घेतली आहे. तेथे स्मशानभूमी विकसित करावी, त्यावर सुनावणी होणे बाकी आहे, असे असताना त्या जागेत परस्पर उद्यानाचे काम सुरू करण्यात आले आहे, असे सरल तलवार यांनी सांगितले

# पिंपरी चिंचवड मेट्रो स्टेशनजवळ पार्किंग झोन नसल्याने प्रवाशांचे हाल

## शहरात मेट्रोस मोठा प्रतिसाद मिळत असला तरी, प्रवाशांसाठी पार्किंगची सोय नसल्याने त्यांची वाहने पदपथांवर बेशिस्तपणे उभी केली जातात.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात मेट्रोस मोठा प्रतिसाद मिळत असला तरी, प्रवाशांसाठी पार्किंगची सोय नसल्याने त्यांची वाहने पदपथांवर बेशिस्तपणे उभी केली जातात. पदपथावरील वाहनांच्या या गर्दीमुळे पादचाऱ्यांना नाईलास्तव रस्त्यांवरून ये-जा करावी लागते. तसेच, त्या भागांत रिक्षा व कॅब थांबत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते दापोडी या मार्गावर मेट्रो धावते. तेथून पुढे स्वारगेटपर्यंत मेट्रो जाते. तसेच, रामवाडी आणि वनाज मार्गावरून नागरिक प्रवास करतात. मेट्रोने प्रवास करण्यास शहरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. असे असले तरी, मेट्रो स्टेशनखाली वाहन पार्क करण्यासाठी पार्किंग झोन तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रवाशांना पदपथावर आपले वाहन लावावे लागत आहे.



### महापालिकेकडून घेतलेल्या जागांवर नाही पार्किंग

» पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून महामेट्रोने घेतलेल्या जागेवर अद्याप पार्किंग झोन विकसित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना वाहने पार्क करण्यासाठी सुरक्षित असे वाहनतळ उपलब्ध नाहीत. त्यामुळे महापालिकेची तसेच, शहरवासीयांची फसवणूक झाल्याचा आरोप केला जात आहे.

### मेट्रो सुरु होऊन तीन वर्षे होऊनही काम संपेना

» मेट्रो सुरू होऊन तीन वर्षे झाले आहेत. तरीही दापोडी ते पिंपरी मार्गावर मेट्रोचे काम सुरूच आहे. नाशिक फाटा मेट्रो स्टेशनखाली काम केले जात आहे. त्यामुळे ग्रेडसेपरेटर मार्ग वाहतुकीस वारंवार बंद करण्यात येत आहे. तसेच, पिंपरी मेट्रो स्टेशन येथील चौथ्या जिन्याचे काम सुरू आहे. त्यासाठी कॉलम टाकण्यासाठी बीआरटी काम बंद करण्यात आला आहे. महामेट्रोच्या या कासव गती कामामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

महामेट्रोकडून कोणतीही सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून दिलेली नसल्याने वाहनांचे नुकसान केले जाते. पेट्रोलची चोरी केली जाते. तसेच, काही जणांच्या दुचाक्या चोरीला गेल्या आहेत. वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे. त्यामुळे प्रवासी वैतागले आहेत.

#### रिक्षा, कॅबचालकांचा बेशिस्तपणा

मेट्रो स्टेशनच्या खाली रिक्षा स्टँडसाठी जागा नाही. असे असतानाही स्टेशनभोवती दोन्ही बाजूला बेशिस्तपणे वेड्या वाकड्या रिक्षा थांबलेल्या असतात. येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला कोठे जायचे अशी विचारणा केली जाते. गुटखा खाऊन रस्त्यांवर अस्वच्छता केली जाते. विरुद्ध बाजूने रिक्षा दामटल्या जातात. तसेच, व्होला, उबेर, रॅपिडो आदी टॅक्सीचालकांकडून बेशिस्तपणे पार्किंग केली जाते.

# पिके जळून गेल्यावर पाणी सोडणार का?

## कळस येथील शेतकरी संतप्त : खडकवासलाचे आवर्तन तातडीने सोडा

**पुणे | प्रतिनिधी**

येथील शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक खडकवासला कालव्याच्या पाण्यापासून डावलण्यात आल्याने परिसरातील पिके पाण्याअभावी जळून चालली आहेत असा आरोप कळस (ता. इंदापूर) येथील शेतकऱ्यांनी खडकवासला पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता पंकज हुलसुरे यांच्याकडे केला. सध्याची पाण्याची गरज ओळखून तातडीने इंदापूरसाठी आवर्तन सुरु करण्याची आग्रही मागणी यावेळी उपस्थितांनी केली.

येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात आज (रविवारी) सकाळी अभियंता पंकज हुलसुरे, शाखा अभियंता शामराव भोसले यांनी ग्रामस्थ शेतकऱ्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी खडकवासला कालवा व वितरीकांच्या आवर्तनाबाबत तक्रारींचा उपस्थित अधिकाऱ्यांसमोर पाढाच वाचला. येथील मुख्य कालवा, त्यावरील 48, 49 व 50 क्रमांकाच्या वितरिकेतून पाणी सोडण्यात होणारा दुजाभाव, वितरिकांची दुरवस्था पिके जळून गेल्यावर पाणी सोडणार का, यांसह अन्य काही समस्या उपस्थित अधिकाऱ्यांच्या कानावर घातल्या.

एकीकडे इंदापूर तालुक्याची शीव ओलांडल्यावर शेतकऱ्यांना पाणी घेण्यावर निर्बंध घातले जातात. तर दुसरीकडे बारामती, दौंड, हवेली तालुक्यात इंदापूरला पाणी पोचण्याअगोदर बेसुमार पाणी उपसा कसा सुरु असतो? या प्रश्नावर अधिकारी निरुत्तर झाले. एकंदरीत इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना खडकवासला कालव्याच्या पाण्यापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जात असल्याचा थेट आरोप उपस्थितांनी केला. यावर तातडीने सुधारणा न झाल्यास सिंचन भवन येथे सामुदायिक आत्मदहन करण्याचा तोंडी इशारा शेतकऱ्यांनी दिला.

यावेळी इंदापूर तालुक्याचा सिंचन कालावधी कमी करण्यात आल्याने, पाणी मिळण्यात अडचणी येत आहेत. वितरिकांच्या दुरुस्तीसाठी 52 कोटी रुपये खर्चाची दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. यानंतर वितरण व्यवस्था सुधारण्यास मदत होईल असे स्पष्टीकरण उपस्थित अधिकाऱ्यांनी दिले.

परिसरातील ओढे, नाले आठले असुन विहिरी, बोरवेलने तळ गाठल्याने शेतीच्या पाण्याच्या प्रश्ना बरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. त्याच बरोबर फिरत्या जनावरांचा देखील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे खडकवासला कालव्याद्वारे तातडीने उन्हाळी अर्वतन सोडण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.



### तलावात पाणी सोडण्यास टाळाटाळ

» कळस गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहीरी असलेल्या गावालगतच्या तलावात पाणी सोडण्याबाबत प्रत्येक आवर्तनाला ग्रामपंचायतीकडून पाटबंधारे विभागाला पत्रव्यवहार केला जातो; मात्र यावेळी या तलावात पाणी सोडण्याचे टाळण्यात आले. यानंतर क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन ग्रामस्थांनी कैफियत मांडली. यावेळी मंत्री भरणे यांनी व्हिडीओ कॉलद्वारे तलाव भरण्याची सूचना करत वितरिकांना तीन दिवस आवर्तन देण्याची सूचना केली; मात्र मंत्र्यांच्या सूचनेनंतरही तलाव भरण्याचे टाळत वितरिकेला दोन तास पाणी सोडण्यात आल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. मंत्र्यांचे अधिकारी ऐकत नसतील तर मग लोकांनी नेमकी तक्रार कोठे करायची, असा सवाल यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला.

### या प्रश्नांचे उत्तर हवे

» इंदापूरकरांच्या वाटणीचे पाणी कमी का झाले? असा सवाल उपस्थितांनी केला. आवर्तन काळात शेतकऱ्यांची वीज बंद केली जाते. कालव्यात आलेले पाणी उपसण्यावर निर्बंध घातले जातात. शेतकऱ्यांच्या पाईप फोडल्या जातात. वितरिकांना केवळ दाखविण्यापुरते तास-दोन तास पाणी सोडले जाते. यासाठी खासगी यंत्रणेची मदत घेतली जाते. त्याचा त्रास शेतकऱ्यांना होतो. वितरिकांना पाणी येत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. यांसारख्या अनेक समस्या उपस्थित शेतकऱ्यांनी यावेळी मांडत यावर अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागितले.

# बारामती रेल्वे स्थानकांचे रूप पालटणार

## भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण 132 रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील १२ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. बारामती रेल्वे स्थानकासाठी 11 कोटी ४० लाख रुपयांचा निधी मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. योजनेत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, आदी महत्त्वाच्या स्थानकांचा समावेश आहे. उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान दिले आहे. देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील १२ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. बारामती रेल्वे स्थानकासाठी 11 कोटी ४० लाख रुपयांचा निधी मिळणार आहे.




### प्रवाशांसाठी सुविधा

» योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

### दौंड, केडगाव, उरुळीला निधी

» पुनर्विकासात पुणे जंक्शन, शिवाजीनगर स्टेशन, लोणावळा स्टेशनसह नऊ स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. बारामती स्टेशन (११ कोटी ४० लाख रुपये), दौंड (४४ कोटी), केडगाव (१२ कोटी ५० लाख), आकुर्डी (३४ कोटी), चिंचवड (२० कोटी ४० लाख), देहू रोड स्टेशन (८ कोटी ५ लाख), तळेगाव स्टेशन (४० कोटी ३४ लाख), हडपसर स्टेशन (२५ कोटी रुपये) तसेच उरुळी स्टेशनच्या विकासासाठी १३ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.